आरएनआय रजि नं. MAHMAR/2011/40781 पोष्ट परवाना No.NMB/128/2015-17

# नागरिक अधिकार

संपादक : सुभाष बसवेकर

वर्ष ५ वे. अंक १ ला. नवी मुंबई दिनांक १ ते ३० सप्टेंबर २०१५ पाने ८ किंमत २० रूपये

## ग्रामसभा : गावातील सर्वोच्च संसद !



माहिती अधिकार कायद्याचा प्रसार करणारे झुंजार मासिक !

www.rtimahasangh.weebly.com

मासिक **नागरिक अधिकार**

सुभाष बसवेकर
● संपादक ●
गणेश काजळे-पाटील
●कार्यकारी संपादक●

संपादक मंडळ /प्रतिनिधी

रामशंकर सरोज (मुंबई)
समीर शिरवाडकर ( मुंबई)
देविदास चौथमल (औरंगाबाद)
भगवान वाहूळे (पूणे)
हरिभाऊ माटेटवार (नागपूर)
सुशांत चोणकर (रायगड)
राजेश बने (रत्नागिरी)
अभिजित पटवा (कोल्हापूर)
प्रीतम यादव (सातारा)
संभाजी सावंत (सांगली)
इब्राहिम पठाण (औरंगाबाद)
मोतीराम काळे (नांदेड)
स.अहमद स.अली अन्सारी(परभणी)

अंक दर महिन्याच्या एक तारखेला प्रकाशित होतो. अंकात प्रकाशीत झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही सर्व वादविवाद पनवेल तालुका न्यायालय कक्षेत.

पत्ता : **नागरिक अधिकार**
प्लॉट नं. डी-२२ सेक्टर-१२
खारघर, नवी मुंबई ४१०२१०
मो.९२२३५१६९२०
E- mail :
rtimahasangh@gmail.com

: web site :
rtimahasangh.weebly.com

या अंकासाठीची छायाचित्रे
इंटरनेट वरून घेतली आहेत.

## संपादकीय...........

# ग्रामसभा : गावातील सर्वोच्च संसद !

देशाचा कारभार चालविण्यात संसद (लोकसभा आणि राज्यसभा) ची खूप मोठी भूमिका असते.राज्याचा कारभार चालविण्यात विधानसभेची महत्वपूर्ण भूमिका असते.तशीच भूमिका गाव चालविण्यात ग्रामसभेकडे असते.परंतु आज आमच्या गावातील गल्ली पासून ते दिल्ली पर्यंत विकासाचे नियोजन दिल्लीमध्ये किंवा मुंबईत बसलेले पन्नास मंत्री आणि शंभर अधिकारी मिळून करतात.आमच्या गावाची योजना दिल्ली - मुंबईत बसलेले सतेच्या उंटावर बसून नियोजनाच्या शेळया हकणारे दिड शहाणे ठरवितात.त्यांनी ठरविलेल्या योजना भले गैरसोईच्या असल्यातरी आम्हाला स्विकाराव्याच लागतात. आमच्या गावात रस्ता कसा व कोठ पर्यंत करणे गरजेचे आहे ?पाण्याची योजना कशी राबवावी ?शाळेची इमारत कशी व किती मोठी हवी ? हे त्या दीडशहाण्यां पेक्षा आम्हा गावकऱ्यांना अधिक चांगले कळते. गावात काय करयाचे याचे निर्णय गावकरी घेतील तर ते अधिक हिताचे होईल हे असे ठरवून सर्व निर्णय प्रक्रियेत सहभागी होवून बहुमताने निर्णय घेण्याचे अधिकार ज्या कायदेशीर प्रक्रियेद्वारे मिळतात ती प्रक्रिया म्हणजेच ग्रामसभा होय. गावाचे आणि आस-पास चे सर्व प्रश्न सोडविण्याचा एक महामंत्र म्हणजे ग्रामसभा होय.गावातील प्रत्येक व्यक्ती १८ वर्षाची होताच आपोआप ग्रामसभेची सदस्य बनते त्यासाठी काही अर्ज किंवा निवेदन देण्याची गरज नाही.ग्रामसभा ही गावातील सर्वात शक्तीशाली व सर्व अधिकार असणारी संस्था असते. ग्रामसभा जर सर्वांत महत्वाची तर मग गावाच्या ग्रामपंचायतीची भूमिका काय काय आणि गरज तरी काय ? तर याच उत्तर असे आहे की ग्रामसभा ही गावाची संसद आहे तर ग्रामपंचायत (म्हणजेच सरपंच व पंच ) हे गावाचे मंत्रीमंडळ असते. ग्रामसभा ही गावतील ज्येष्ठ नागरिक किंवा सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली चालविली जाते.गावाचा विकासाचे व हिताचे निर्णय ग्रामसभेत करायचे व या निर्णयांची ग्रामपंचायतीने अंमलबजावणी करायची असे होणे अपेक्षित आहे. ग्रामसभेला आजही काही तटपूंजे अधिकार मिळालेले आहेत.परंतु ते पुरेसे नाहीत. गावात ग्राम व शहरात वार्ड सभेला आणखी विशेष असे दंडात्मक ,कायदेशीर आणि घटनात्मक अधिकार मिळाले तर गाव व नगर पातळीवरील व आसपासचे सगळे प्रश्न चुटकी सरशी सुटतील

# लोकशाही नको आता लोकसहभागशाही हवी



सच्ची लोकशाही केंद्र में बैठे दस-बीस आदमी नही चला सकते ,वो तो निचेसे हर गांव के लोगो द्वारा चलाई जानी जाहिए । ताकी सत्ता के केंद्र बिंदू जो इस समय दिल्ली ,बंबई जैसे बडे शहरों में है , मैं उसे भारत के सात लाख गांव में बाँटना चाहूंगा ।- मं . गांधी

## ग्रामसभा : गावातील सर्वोच्च संसद !

| | | |
|---|---|---|
| एकाच व्यक्तीकडे सत्ता | = | हुकूमशाही |
| दोन व्यक्तीकडे सत्ता | = | संगनमतशाही |
| तीन व्यक्तीकडे सत्ता | = | त्रिकूट |
| चार व्यक्तीकडे सत्ता | = | चांडाळ चौकडी |
| पाच व्यक्तीकडे सत्ता | = | पंचायत |
| काही व्यक्तीकडे सर्व सत्ता | = | प्रतिनिधीशाही |
| सर्व जनतेकडे थेट सत्ता | = | स्वराज ! |

हाती काहीच लागत नाही तेव्हा मिळतो तो अनुभव !

# ग्रामसभा आमचा हक्क आमचा आवाज !

# लोकशाही नको आता लोकसहभाग शाही हवी

ग्रामपंचायतीची खरी ताकद शासनाच्या विविध पातळयांवरून प्रदान केलेले अधिकार किंवा आर्थिक सहाय्य नसून गावातील लोकांचा सहभाग व लोकांचे नेतृत्व आहे. गावपातळीवरच खरी लोकशाही व्यवस्था अमलात येऊ शकते. बाकी स्तरावर प्रातिनिधिक लोकशाही व्यवस्था आहे. विकासाची कामे केवळ पैशाने नव्हे तर लोकांच्या निर्धाराने य सहभागाने होतात. लोकशाही व्यवस्थेत म्हणूनच सहभागी लोकशाही ला महत्व आहे. ग्रामसभा म्हणजे गावाची सर्वसाधारण सभा व ग्रामपंचायत म्हणजे ग्रामसभेची कार्यकारी समिती असे एकंदरीत स्वरूप असते. ग्रामसभा सर्व जाती वर्गांना सामावून घेणारी,व्यक्तीची प्रतिष्ठा व समतेचा पुरस्कार करणारी असते.

गावातील सर्व मतदारांची मिळून ग्रामसभा बनते. ग्रामसभेद्वारे सरकारी कामांवर देखरेख अन्याय अत्याचार भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्याचे काम करता येते. त्याशिवाय समस्यांचा विचार करून त्या सोडविण्यासाठी योजना आखणे व त्या अमलात आणणे शक्य होते.

ग्रामसभेची वैशिष्ट्ये :

प्रातिनिधिक अधिकारांपेक्षा वेगळा.

लोकांची क्षमता मान्य करणारा व त्यास वाव देणारा.

ग्रामस्थांच्या कुवतीवर विश्वास ठेवणारा.

खऱ्या अर्थाने विकेंद्रित लोकशाही बळकट करणारा आहे म्हणूनच ग्रामसभेचा आग्रह धरा.

ग्रामसभा-कायदेशीर तरतुदी :

एका वर्षात किमान चार ग्रामसभा घेतल्याच पाहिजे. जास्तीत जास्त कितीही घेता येतील.

ग्रामसभेच्या दोन सभा दरम्यान चार महिन्यांपेक्षा जास्त कालावधी असता कामा नये.

सरपंचाने योग्य कालावधीत सभा न बोलविल्यास सचिव ग्रामसभा बोलावेल. ही ग्रामसभा सरपंचाच्या किंवा उपसरपंचाच्या सहमतीने बोलवली असे मानले जाईल.

पहिल्या ग्रामसभेचा अध्यक्ष सरपंच किंवा त्याच्या गैरहजेरीत उपसरपंच असेल. नंतरच्या ग्रामसभेचा अध्यक्ष ग्रामसभा सदस्यांतून निवडता येईल.

पहिली ग्रामसभा १ मे ला होईल. दुसरी १५ ऑगस्ट,तिसरी नोव्हेंबर व चौथी २६ जानेवारी या दिवशी घेण्यात यावी. नियमित ग्रामसभेपूर्वी महिला ग्रामसभा घेण्यात यावी. अन्य ग्रामसभा किमान सात दिवसांचा वेळ देऊन सर्वांना निरोप पोहचवून सर्वसमावेशक व सर्वांच्या सोयीच्या वेळी घेता येईल.

महिला ग्रामसभेचे इतिवृत्त नियमित ग्रामसभेपुढे सरपंच ठेवतील,ग्रामसभा त्यातील शिफारशींचा विचार करील. शिफारशींशी सहमत नसल्यास कारणांची नोंद करील.

नोव्हेंबर महिन्यात होणाऱ्या ग्रामसभेला अंदाजपत्रकाची ग्रामसभा असे म्हणतात.इतरवेळी आवश्यक वाटल्यास जादा ग्रामसभा सरपंच बोलावू शकतात. पंचायत समिती,मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सूचनेवरूनही जादा ग्रामसभा बोलावली जाते.गावात काम करणाऱ्या सर्व शासकीय,निमशासकीय कर्मचाऱ्यांवर ग्रामसभेचे शिस्तविषयक नियंत्रण असेल. अशा कर्मचाऱ्यांचे वार्षिक मूल्यमापनग्रामसभेकडून त्यांच्या वरिष्ठांच्या निदर्शनास आणून दिले जाईल. अगर ग्रामसभा सदरचे अधिकार ग्रामपंचायतीला सोपवू शकते.

ग्रामसभेची नोटीस सात पूर्ण दिवस आधी दिली पाहिजे. जादा ग्रामसभेची नोटीस चार दिवस आधी दिली पाहिले ग्रामसभेच्या नोटिशीत सभेचा दिवस,वेळ,जागा व सभेपुढील विषय इ. माहिती लिहिली पाहिजे

ग्रामसभा,ग्रामसभेचा वेळ,दिनांक आणि ठिकाण तिच्या अगोदरच्या सभेत निश्चित करेल. ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांच्या प्रभागात नियमित सभेपूर्वी सभा घेऊन प्रभागातील विकास प्रकल्प व कार्यक्रम याबाबत विचार विनिमय करून त्याचे इतिवृत्त सदस्यांनी सहीनिशी ठेऊन त्याची एक प्रत ग्रापंचायतीला पाठवली पाहिजे. सदर दलित,आदिवासी,महिला, व तरूणांच्या आशा, आकांक्षा, व्यथा वेदनांना वाव देणारे गावाचे शहाणपणा,सदिच्छा व कर्तुत्व व्यक्त करणारे - लोकांचे व्यासपीठ म्हणजे ग्रामसभा

# ग्रामसभा आमचा हक्क आमचा आवाज !



गावात काम करणाऱ्या शासकीय,निमशासकीय व पंचायतीच्या कर्मचाऱ्यांवर जसे की शिक्षक,आंगणवाडी ताई परिचारिका, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डॉक्टर्स व अन्य कमर्चारी, तलाठी वन अधिकारी व अन्य शासकीय कर्मचारी ग्रामसभेचे शिस्तविषयक नियंत्रण राहील. अशा कर्मचाऱ्यांचे वार्षिक कामांचे मूल्यमापन त्यांच्या वरिष्ठ प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले जाईल.

राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या व्यक्तिगत लाभधारक योजनांकरिता लाभधारकांची निवड ग्रामसभा करील.

जसे की अनुदानावरील शेती व अन्य अवजारे व उपकरणे ,शालेय मुलीना सायकल वाटप,विधवा वेतन योजना,शेतमूजर वृधापकाळ योजना,तसेच इतर सर्व अन्य योजना

ग्रामसभा पुढील सभेचा दिनांक,वेळ,आणि ठिकाण अगोदरच्या सभेत निश्चित करेल.

ग्रामपंचायतीला सामाजिक व आर्थिक विकासाच्या योजना,कार्यक्रम किंवा प्रकल्प यांची अंमजबजावणी करण्यापूर्वी ग्रामसभेकडून मान्यता घ्यावी लागेल.

विकास योजनांवर कोणताही खर्च करण्यास पंचायतीला ग्रामसभेची परवानगी घ्यावी लागेल.रस्ते बांधणे बाजर तळ बांधणे नाली बांधणे अन्य विकासकामे करणे

शासकीय कामाकरिता जमीन अधिग्रहित करण्यासाठी ग्रामसभेचे मत घेणे आवश्यक राहील. ग्रामसभेने बहूमताने ठराव दिला तरच पुढे राज्यशासनास जमीन अधिग्रहित करता येईल अन्यथा नाही.

कर्तव्य : ग्रामसभा वर्षातून किमान चार वेळा घेण्यात येईल.

ग्रामसभेच्या दोन सभांमध्ये तीन महिन्यापेक्षा जास्त अंतर नसेल.ग्रामसभेच्या प्रत्येक नियमित सभेपूर्वी ग्रामसभेच्या महिला सदस्यांची सभा घेण्यात येईल.

सरपंच किंवा उपसरपंचाने दिलेल्या कालावधीत कोणतीही सभा बोलवली नाही तर अशावेळी सचिव सभा बोलवतील. हि सभा सरपंच व उपसरपंच यांनी बोलावली असल्याचे गृहीत धरण्यात येईल.

पंचायतीच्या प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या ग्रामसभेच्या पहिल्या सभेत सरपंच व त्यांच्या अनुपस्थितीत उपसरपंच अध्यक्षस्थानी राहील.

ग्रामसभेच्या प्रत्येक सभेचे कार्यवृत ग्रामपंचायतीचा संबंधित सचिव तयार करील व ठेवील आणि त्याच्या अनुपस्थितीत सरपंच निर्देश देईल त्याप्रमाणे गावात काम करणारा शिक्षक,तलाठी किंवा अंगणवाडी सेविका यासारखा कोणताही शासकीय,निमशासकीय/पंचायतीचा कर्मचारी कार्यवृत्त तयार करील आणि ते अभिलेखासाठी पंचायतीकडे सुपूर्द करील.

ग्रामसभा यशस्वी करण्यासाठी घ्यावयाची काळजी:

सर्वसाधारण ग्रामस्थ,विशेषत:शेतमजूर व स्त्रिया यांना सोयीचा दिवस व वेळ ग्रामसभेसाठी निवडावी.

ग्रामसभेची तारीख,वेळ,आणि ग्रामसभेपुढील विषय व्यापक पूर्वप्रसिध्दी द्यावी. दवंडीद्वारे लाऊडस्पिकर वरून ग्रामपंचायत कार्यालय व गावातील

मोक्याच्या जागी मोठे ठळक फलक लावून अशी प्रसिद्धी करता येईल. तसेच गावातील शाळेच्या प्रत्येक वर्गात ग्रामसभेची माहिती सांगून मुलांना आपल्या पालकांना सभेत पाठविण्यास प्रवृत्त करावे. त्यामुळे भावी पिढीवरही ग्रामसभेचे संस्कार होतील. ग्रामसभेपूर्वी गावातील स्वयंसेवी संस्था, अंगणवाडी सेविकेमार्फत महिला मंडळाला ग्रामसभेची माहिती देण्यात आली तर महिलांचा सहभाग ग्रामसभेत वाढेल.

ग्रुप ग्रामपंचायत असल्यास प्रत्येक गावात आळीपाळीने ग्रामसभा घेतली जावी. एरव्ही गावातील वेगवेगळया वाडी/ पाड्यांवर आळीपाळीने ग्रामसभा घेण्यात यावी.

# ग्रामसभेच्या कामकाजाचा लेखा जोखा मागण्यासाठी

## आरटीआय अर्ज नमुना

काही गावात ग्रामसभेचे काम उत्तम व पारदर्शक चालते परंतु काही गावात अजूनही सरंपच पंच व ग्रामसेवक कागदवरच ग्रामसभा भरवितात.गावाची मान्यता नसणारे ठराव करतात ग्रामसभेचे नियम पाळत नाहीत.अशा नियमबाहय व बोगस ग्रामसभांची माहिती अधिकारा माहिती उघड करून मिळालेली माहिती कार्यकर्त्यांनी सर्व गावांसमोर मांडावी

केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अनुसार अर्ज

(जोडपत्र " अ "नियम ३ नुसार)

प्रति,
जनमाहिती अधिकारी
ग्रामपंचायत कार्यालय किंवा
पंचायत समिती कार्यालय --------------
ता.------------ जि.----------------

१) अर्जदाराचे नांव - ----------------------------------------------
२) अर्जदाराचा पूर्ण पत्ता : ----------------------------------------------
३) माहितीचा विषय -आपल्या ग्रामपंचायत ------------ या गावातील आयोजिलेल्या ग्रामसभांची माहिती मिळणेबाबत
४)आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील व कालावधी (पुढीलप्रमाणे)

१. गेल्या वर्षभरात सर्व किंवा -------------- दिनांक रोजी पार पडलेल्या ग्रामसभेच्या इतीवृत्ताची / मिनिटस ची प्रत मिळावी. ग्रामसभेला उपस्थित असणाऱ्या सर्व मतदारांचे उपस्थिती रजिस्टरची झेरॉक्स द्यावी

२).ग्रामसभेत झालेल्या ठरावाची प्रत मिळावी.ग्रामसभेत ठरविलेल्या लाभार्थींची नावे व लाभाचा प्रकार या विषयी सहमतीने ठरविलेली लाभार्थीच्या नांवाची यादी ची प्रत वा याची नोंदविलेली माहिती द्यावी.

३. ग्रामसभेत सादर केलेल्या ग्रामपंचायतीच्या अंदाजपत्रकाची झेरॉक्स प्रत मिळावी तसचे ग्रामसभेत सादर केलेल्या ग्रामपंचायतीच्या वार्षीक हिशोबाची जमा खर्च ताळेबंद पत्रकाची झेरॉक्स पत मिळावी.किंवा लेखा परिक्षण झाल्याची ग्रामसभेत सादर केलेली ऑडीट कॉपी ची प्रत द्यावी.

४) गावाच्या कारभार व्यवस्थीत चालावा म्हणून ग्रामसभेत निवडल्या गेलेल्या पाणी पुरवठा समिती, शिक्षण समिती, शांतता समिती, व रेशन दुकान दक्षता समिती आदि सर्व समित्याची सदस्य व हुद्दा अशी यादी मिळावी

५) माहिती टपालाने हवी की व्यक्तिश : स्पीड पोष्टाने / व्यक्तीश : घेऊन जाईन
६) अर्जदार दारिद्र्य रेषेखालील नाही (१० रूपयाचा कोर्ट फी स्टॅम्प जोडला आहे)

ठिकाण : ----------- अर्जदाराची सही

दिनांक : ------------- (नाव ---------------------------------)

व्यक्तीला पकडून जबरदस्तीने बसवावे लागते अशी जगात दोनच ठिकाणे आहेत , एक तुरुंग आणि दुसरी शाळा !

जनजागृती ! संरक्षण ! ! संघर्ष ! ! !

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

आरटीआय कार्यकर्त्यांची राज्यव्यापी एकजूट !

संपर्क : प्लॉट नं.डी-२२, सेक्टर- १२ खारघर, नवी मुंबई -४१०२१०

## सभासद फार्म

फोटो

नाव : ------------------------------------------------------------

पत्ता :------------------------------------------------------------

-------------------------------- पीनकोड

मोबाईल :

ई मेल :---------------------

शिक्षण : ----------------------- जन्मदिनांक ------------------------------

व्यवसाय :--------------------- येणाऱ्या भाषा : ------------------------------

माहिती अधिकार कार्य व समाजकार्याचा अनुभूव किती वर्षाचा आहे : ---------------------

इतर कोणत्या राजकीय किंवा सामाजिक संस्थेशी संबधीत आहात : ---------------------

माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे पदाधिकारी म्हणून कोणत्या स्तरावर कार्य करण्यास इच्छूक आहात ? :गाव/ शहर/ तालूका / जिल्हा /------------------------------------

मी प्रतिज्ञापूर्वक आणि विवेकपूर्वक निवेदन करतो की मला आपण माहिती अधिकार कार्यकता महासंघाचा वार्षिक सभासद करून घ्यावे.मी ओळखपत्र खर्च २०० रूपये पोष्टेज खर्च १०० रूपये आणि २०० रूपयांची तीन पुस्तक व स्थानिक शाखा शुल्क १०० रूपये असे एकत्रीत ६०० रूपये भरीत आहे.सभासद ओळखपत्र व नागरिक अधिकार विषयक पुस्तके मला माझ्या पत्यावर पाठवून द्यावीत.मी भारतीय संविधानाने घालून दिलेल्या कायदेशीर कक्षेत नागरिक म्हणून दिलेल्या अधिकारक्षेत्रातच कार्य करीनृ तसेच माहिती अधिकार महासंघाच्या कार्यकर्ता आचारसंहितेचे काटेकोर पालन करीन.कोणतेही बेकायदेशीर कृत्य करणार नाही. आपला विस्वासू

दिनांक : / /

ठिकाण : ------------- सही

### कार्यालयीन उपयोगासाठी

सभासद कोड नंबर

- ओळखपत्र मुदत आरंभ दिनांक / / २०१५ मुदत समाप्तीचा दिनांक / / २०१६
- पदाधिकारी म्हणून नियुक्ती झाली ते पद ------------------------------ आयडी पाठविलाचा स्पीड पोष्ट दिनांक
- सभासद प्रक्रिया शुल्क बँक अकाऊंट ने दि. / / २०१ रोजी जमा झाली

सभासद होऊ इच्छिणारे कार्यकर्ते हा अर्ज स्वच्छ अक्षरात भरुन फोटो लावून सही करुन याची स्कॅन कॉपी **rtimahasangh@gmail.com**या ई मेल वर पाठवून द्या.

किंवा आपण वेबसाईट **rtimahasangh.weebly.com** वरूनही ऑनलाईन सभासद फार्म भरू शकता

# माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र

## कार्यकर्त्यांना आवाहन

महाराष्ट्रातील माहिती अधिकार कार्यकर्ते,सामाजिक व राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते ,पत्रकार जागरूक नागरिक यांच्याकडून - शासकीय कार्यालयातील भ्रष्टाचार व गैरव्यवहारांची अनेक प्रकरणे बाहेर काढण्यासाठी माहितीचा अधिकार या कायद्याचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झालेला आहे.परंतु सदर कायद्याचा आणखी परिणामकारक वापर व्हावा व त्यातून प्रशासन आधिक पारदर्शी व लोकाभिमूख व्हावे या उद्देशाने माहिती अधिकारांचा वापर करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या जागरूक नागरिकांचे परस्परांना मदत व सहकार्य व्हावे व त्यांना वैधानिक मार्गदर्शन आणि सहकार्य मिळावे तसेच प्रशासनातील भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणण्यासाठी माहिती अधिकार कायदा नेमकेपणे कसा वापरावा ? नेमकी व मुद्येसूद माहिती कशी विचारावी ? कार्यकर्त्यांच्या अनुभवांची परस्परात देवाणघेवाण व्हावी म्हणून आरटीआय कार्यकर्त्यांचे महाराष्ट्रव्यापी व्यासपीठ असणे गरजेचे झाले आहे

.तसेच माहिती अधिकार कार्यकर्त्यावर गंभीर हल्ले करणे तसेच धमक्या देणे असे प्रकार खूपच वाढले आहेत.या पासून कार्यकर्त्यांना सरंक्षण मिळावे तसेच त्यांना राज्याच्या राजधानी पासून ते आपल्या गावापर्यंत पाठबळ मिळावे म्हणून कार्यकर्त्यांच्या एकजूटीची खूपच आवश्यकता आहे. यासाठी तसेच महाराष्ट्रभरातील अनेक कार्यकर्त्यांशी व्यापक बोलणी व चर्चा केल्यानंतर आम्ही महाराष्ट्रव्यापी व सर्व राजकीय प्रवाहापासून अलिप्त व शुद्ध सामाजिक असा **माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, महाराष्ट्र** स्थापन केला असून या अंकामध्ये यांसबंधीचा एक सभासद फॉर्म दिला आहे.या महासंघाचे जिल्हा तालुका व शहर स्तरावरील पदाधिकारी म्हणून काम करण्यास इच्छूक असणारे माहिती अधिकार कार्यकर्ते, दक्ष व जागरूक नागरिकांनी या अंकात पान ७ वर दिलेला सभासद फॉर्म झेरॉक्स करून सविस्तर भरून फोटो चिकटवून तो सायबर कॅफेमधून स्कॅन करूनही **rtimahasangh@gmail.com** या ई मेलवरूनही पाठविल्यास अधिक सोईचे होईल.. ओळखपत्र खर्च / पोष्टेज व नागरिक अधिकार प्रकाशनांची तीन पुस्तके असे एकत्रीत मुल्य ६०० रूपये स्टेट बँक ऑफ इंडिया च्या कोणत्याही शाखेतून खाते नंबर **32619447406** स्वराज बहुउद्देशिय संस्था,खारघर नवी मुंबई या नावाने भरावेत..बँकेत पैसे भरताच आपले नाव व पत्ता **9223516920** या नंबरवर फोन करून कळवावा.आपणास आपल्या पत्यावर सभासद ओळखपत्र व पुस्तके पाठवली जातील.सभासदांना महासंघाच्या वेबसाईडवरून **web site : rtimahasangh.weebly.com** ऑनलाईन फार्म भरता येईल.तरी जास्तीत जास्त माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी सभासद व्हावे असे आवाहन करण्यात येत आहे.

Date of Publication 1st, Date of Posted 5th at New Panvel Post Office
पोष्ट परवाना. No.G/NMD/128/2012-14

प्रति,

पाठविणार
पत्ता: **नागरिक अधिकार**
प्लाट नं. डी-२२, सेक्टर-१२ खारघर
नवी मुंबई ४१०२१०
महाराष्ट्र
मो ९२२३५१६९२०

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुभाष महादेव बसवेकर यांनी स्वराज प्रिंट प्रोसेस कार्यालय, सेक्टर-१०, कोपरा ब्रीजजवळ, खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१० येथे मुद्रीत करून, अे विंग फ्लॅट-०३ साईसदन सोसायटी प्लॉट नं.५६ सेक्टर-१९ खारघर ता.पनवेल जि.रायगड ४१० २१०येथे प्रकाशीत केले. रजि नं. MAHMAR/2011/40781